*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# कर्मवीर भाऊराव पाटील आणि शैक्षणिक चळवळ

**डॉ. निलकंठ कामण्णा लोखंडे**
सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
श्री.रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालय, सावळज ता. तासगांव जि. सांगली

.........................................................................................................................

**प्रस्तावना –**

कर्मवीर भाऊराव पाटील हे जन्माने जरी उच्च समाज घटक (जैन) असले तरीही ते एक बहुजनवादी विचारवंत, कार्यकर्ते, बहुजनवादी चळवळीचे कार्यकर्ते, चळवळीचे वाहक होते. कारण वि. रा. शिंदे, महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब अंबेडकर यांचा त्यांच्यावर प्रभाव होता. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा सन १८८७ ते १९५९ या कालखंड आहे. मात्र त्यांनी १९०९ मध्ये शैक्षणिक आणि सामाजिक कार्यात सहभाग घेण्यास सुरूवात केली. त्यानंतर शेवटपर्यंत त्यांनी विविध क्षेत्रात सामाजिक कार्याच्या क्षेत्रात सहभाग घेत भरीव स्वरूपात शैक्षणिक कार्य, अस्पृश्यता निर्मुलन, जमीन सुधारणा, राजकीय पार्श्वभूमी निर्माण करणे, समता असणारा समाज निर्माण करण्याचे प्रयत्न, श्रम प्रतिष्ठा समाजात रूजवणे, सत्यशोधक चळवळीच्या माध्यमातून समाज जागृत करणे अशा स्वरूपातील भरीव असे कार्य केले. बहुजन समाजासाठीचे हक्क, अधिकार मिळवून देण्यासाठी शैक्षणिक चळवळीच्या माध्यमातून समाज जागृतीचे कृतीशिलपणे कार्य केले आहे. त्यांनी विचार मांडून शैक्षणिक सामाजिक चळवळीच्या माध्यमातून विचार प्रत्यक्षात कृतीत उतरवण्याचे कार्य केले.

**कर्मवीर भाऊराव पाटील आणि शैक्षणिक चळवळ**

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक चळवळीतून आणि त्यांच्या कृतीतून शिक्षण, समता, अस्पृश्य निर्मुलन, स्वावलंबन, ग्रामीण विकास, ग्रामीण भागात शिक्षणाचे जाळे, जागृतीसाठी बहुजनवादी चळवळीचा वापर अशा विविध कार्यक्रमातून आपला दृष्टिकोन पुढे आणलेला दिसून येतो. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक चळवळीतून शैक्षणिक संस्थाचे जाळे निर्माण केले आणि सत्यशोधक चळवळीतील कार्य केले. या कार्याच्या माध्यमातून आणि शैक्षणिक चळवळीतून त्यांना ग्रामीण भागातील मागास समाजात परिपक्वता, बहुजन समाजास हक्क, अधिकार, समता आणि प्रतिष्ठा मिळवून देण्याचे कार्य केले. भाऊरावांनी केलेल्या कार्याला सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक अशा विविध बाजू होत्या. मात्र केंद्रस्थांनी बहुजन समाज होता. त्यांनी आपल्या शैक्षणिक चळवळीत बहुजनवादी विचार केंद्रस्थांनी ठेवला होता. या सर्व कार्य आणि विचारातून त्यांनी बहुजन समाजाची जागृती केली असे दिसून येते. त्यामुळे या लेखात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विशेषतः बहुजनाच्या शैक्षणिक चळवळीवर थोडक्यात प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

भाऊराव पाटील यांनी १९१५ फेब्रुवारी ते १९२१ च्या नोव्हेंबरपर्यंत सत्यशोधक समाजाचा प्रचार केला. तेव्हा समाज जातीपातीने विभागला होता. अज्ञानाने राजकीयदृष्ट्या इंग्रजांच्या गुलामगिरीत, तसेच धार्मिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरीत अडकलेला होता. भाऊरावांनी या सर्वांवर उपाय म्हणजे लोकांना 'शिक्षण' देणे हा विचार स्वीकारला. भाऊराव पाटलांची भूमिका ही बहुजन समाजाच्या समस्यांवर उपाय म्हणेज शिक्षण ही होती. केशवराव ठाकरे यांच्या विचारांनुसार स्वंबळावर गोर–गरिबांचे शिक्षण कार्य सुरु केले. आपल्या स्वतःच्या घरात १९२४ मध्ये एक हरिजन विद्यार्थी ठेवून कार्यास सुरुवात केली. एकूणच बहुजनांच्या शिक्षणासाठी भाऊराव पाटीलांनी समाजातील प्रतिष्ठितांचे सहकार्य घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यामध्ये अपयश आल्यानंतर त्यांनी खचून न जाता स्वबळावर शिक्षणाचे कार्य करण्याचा निर्णय घेतला. रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेचा ठराव भाऊराव पाटील यांनी सामाजिक कल्याणाची भूमिका घेतली होती. सत्यशोधक समाजातील मंडळीनी ब्राह्मणेतर पक्ष स्थापन करून त्यांचा सत्तेत भागीदारी मिळविण्याच्या प्रयत्न होता.

१९२० साली पुण्यात ब्राह्मणेतर पक्ष स्थापण्यात करण्यात आला. यानंतर भाऊरावांच्या लक्षात आले की, राजकारणाच्या पाठीमागे लागल्यास सत्यशोधक समाजाचे सामाजिक व शैक्षणिक सुधारणेचे काम होणार नाही. यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सत्यशोधक समाजाची परिषद २५ सप्टेंबर, १९१९ रोजी काले, ता. कराड या गावी भरली होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्याच्या दृष्टीपुढे खेड्यातील सामान्य शेतकरी 'रयत' असल्याने त्यांनी या सभेमध्ये 'रयत शिक्षण संस्था' स्थापण्याचा ठराव मांडला. त्याद्वारे सत्यशोधक समाजाचे शैक्षणिक कार्य करण्याचा ठराव एकमताने पास झाला. मात्र तिच्यामार्फत शाळा वगैरे तात्काळ सुरु न करता दुधगावच्या धर्तीवर विद्यार्थी वसतिगृह सुरु करण्याचा पूरक ठराव मांडला त्यास मंडळाकडून मान्यता मिळाली. दि. ४ ऑक्टोबर १९१९ रोजी दसऱ्याच्या दिवशी हे वसतिगृह सुरु झाले. रयत शिक्षण संस्थाही स्थापन करण्यात आली. दाजी पाटील, नारु काका खोत, भाऊराव चौगुले, बंडोबा शेटे यांनी वसतिगृहाची जबाबदारी घेतली होती. (काटकर मा. भि., १९९७ पृ. २४). रयत शिक्षण संस्थेची आधारभूत तत्त्वे स्वावलंबन, आर्थिक स्वावलंबन, कमवा व शिका आणि धर्मनिरपेक्षता ही होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद!' हे संस्थेचे बोधवाक्य ठरविले होते. स्वयंप्रकाशित व्हा, स्वावलंबी व्हा, हा त्यांचा संदेश होता. स्वावलंबन म्हणजे स्वातंत्र्य, स्वावलंबन सांभाळणे हे बुद्धाचे ध्येय होते. तसे महात्मा फुले यांचेही होते. रयत शिक्षण संस्थेस युनियन बोर्डिंगची जागा कायमची मिळाली. महार, मांग, चांभार, कुंभार, साळी, कोष्टी, मुसलमान, जैन, लिंगायत, मराठा अठरापगड जातींची मुले एकत्रित राहत आणि स्वत:च्या श्रमाने, स्वावलंबनाने जगत होती, शिक्षण घेत होती. भाऊराव पाटील यांचा जातीपातीविरहित सामाजिक कल्याणाचा हा प्रयोग होता. या प्रयोगामध्ये भाऊरावांना यश आले होते.

१९२७ मध्ये छत्रपती शाहू महाराजांच्या मालकीची सातारा येथील धनिणीची बाग भाऊराव पाटील यांनी वार्षिक ५७५ रुपये खंडाने घेतली. सर्व विद्यार्थ्यांना या वसतिगृहात ठेवले. या वसतिगृहात स्वावलंबी शिक्षणाची योजना राबविली. छत्रपती शाहू महाराजांचे नाव या वसतिगृहास दिले. (काटकर मा. भि., १९९७ पृ. ३५) कर्मवीर भाऊराव पाटील यांनी प्रशिक्षण महाविद्यालय, दुर्गम भागात शाळा सुरू केल्या. बाल गुन्हेगार मुलांसाठी शाळा, उच्च शिक्षण, व्यावसायिक व कौशल्यपूर्ण शिक्षण देऊन व्यक्तीच्या सुप्त क्षमता ंचा विकास केला. शिक्षकांना कौशल्य प्राप्त करण्याकरिता सातारा येथे ट्रेनिंग कॉलेज सुरु केले. १९३६ पर्यंत भाऊराव ज्या सातारा, सांगली आणि कोल्हापूर परिसरात राहात होते, त्या परिसरातील ग्रामीण भागात तात्कालीन काळात शिक्षणाची सोय नव्हती. मात्र भाऊरावांनी ही बाब लक्षात घेत त्यांनी या ग्रामीण भागात शाळा सुरू करण्यास सुरूवात केली. भाऊराव पाटील यांनी संस्थेमार्फत अशा ५७८ शाळा चालविल्या होत्या. या शाळेत इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग एक शिक्षक सांभाळत. भाऊराव पाटील यांनी ७ वी पास झालेल्या अनेक तरुणांना स्वयंसेवी मराठी शाळेवर शिक्षक म्हणून काम करण्याची संधी दिली. या शिक्षकांना ट्रेनिंग कॉलेजमध्ये ट्रेनिंगसाठी पाठवून प्रशिक्षित करीत आणि ते स्कूल बोर्डाच्या शाळेवर शिक्षक म्हणून नोकरी करीत. या शाळांसाठी संस्थेचा स्वतंत्र प्रशासकीय विभाग होता. स्कूल बोर्डाच्या प्रशासनाप्रमाणे शिक्षणाधिकारी, सुपरवायझर, कारकून असा वर्ग होता, स्वतंत्र ऑफिस होते. या कार्यालयातील सर्व सेवकांच्या पगारावर शासन अनुदान देत असे. खाजगी शिक्षण संस्थेच्या एवढ्या मोठ्या संस्थेने चालविलेल्या शाळांसाठी स्थापन केलेल्या कार्यालयातील सेवकांच्या पगारावर अनुदान देण्याची योजना ही त्या काळी मुंबई प्रांतातील एकमेव घटना होती.

सर्व शिक्षण प्रशिक्षित शिक्षकांच्या अधिन असावे सातारा येथे रयत शिक्षण संस्थेतर्फे १९३५ साली सिल्व्हर ज्युबली रुरल ट्रेनिंग कॉलेज सुरु झाले. या कॉलेजच्या वितरण प्रसंगी बाळासाहेब खेर यांना प्रमुख पाहुणे म्हणून बोलवितांना कर्मवीरांनी पत्रात प्राथमिक शिक्षण बहुजन समाजाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असल्याने ते सक्तीचे व मोफत असावे तसेच सर्व शिक्षण प्रशिक्षित शिक्षकांच्या हातीच असावे असे मत व्यक्त केले. (मगदूम आ. भा, १९९६,

पृ. ५५). २० जून, १९४० मध्ये 'महाराजा सयाजीराव गायकवाड फ्री ॲन्ड रेसिडेन्शिअल' (मोफत व वसतिगृहयुक्त विद्यालय) सुरु केले. तात्कालीन काळी हा एक अभिनव उपक्रम होता. वस्तुनिष्ठ शिक्षणाचा हा प्रयोग होता. या प्रयोगातून दृश्य स्वरुपात चांगले परिणाम दिसू लागतील अशी भाऊरावांची खात्री होती. महाविद्यालयांची स्थापना भाऊराव पाटील यांनी शैक्षणिक कार्याची सुरूवात वसतिगृह स्थापन करून केली आणि नंतर प्राथमिक शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या. ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षणाची गरज होती ती ओळखून प्राथमिक शिक्षणाला प्राधान्य दिले. तात्कालीन काळात शहरी भागात उच्च शिक्षणाची सोय होण्यासाठी महाविद्यालयांची स्थापना होत होती, परंतु ग्रामीण भागात प्राथमिक शिक्षण गरजेचे असल्यामुळे भाऊराव पाटील यांनी प्राथमिक शिक्षणान ंतर उच्च शिक्षणास प्राधान्य दिले आणि श्रमाच्या मोबदल्यात उच्च शिक्षण मोफत अशी जाहिरात करुन भाऊराव पाटील यांनी 'छत्रपती शिवाजी कॉलेज' सुरु केले. विविध विद्यालय आणि महाविद्यालय सुरु करण्यासाठी अनेकांकडून देणगी रुपाने रक्कमा तसेच जमिनी स्वीकारल्या, भाऊरावांची या संदर्भातील विचारसरणी 'एका श्रीमंताने एक लाख रुपये देण्यापेक्षा एक लाख लोकांनी एक एक रुपया दिलेला अधिक मोलाचा असतो. यामुळे सार्वजनिक कामात लाख लाखोंचा सहभाग व लाखो लोका ंची सहानुभूती मिळते.' माध्यमिक शाळांकरिता प्रशिक्षित शिक्षक हवेत यासाठी सातारा येथे 'आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन महाविद्यालय' सुरु केले. दुष्काळी व मागास भागात महाविद्यालये सुरु करण्यात आली. श्रमातून शिक्षण घेण्याच्या स्वावलंबी अशा अभिनव शैक्षणिक प्रयोगामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली. ही बाब सांगली, कोल्हापूर आणि सातारा या परिसरात खूप वेगळ्या पातळीवर बदल घडवून आणणारी होती. कारण मानवी विचारांचा पायाच हा शिक्षण आहे. त्यास कार्यास त्यांनी सुरूवात केली होती. त्यांच्या कार्यातून संपूर्ण सामाजिक, राजकीय व्यवस्था बदलून टाकण्याचा के लेला प्रयत्न पुढे घडून आलेले दिसून येतात.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रेरणेतून निर्माण झालेल्या शैक्षणिक संस्था महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील शिक्षणप्रेमी समाजसेवकांनी शैक्षणिक संस्था सुरु करताना वसतिगृहे त्यांचा अविभाज्य घटक करण्यावर भर दिला. पश्चिम महाराष्ट्रातील खेड्यापाड्यांत स्वय ंसेवी शिक्षकांमार्फत स्वयंसेवी प्राथमिक शाळा चालविण्याचे तंत्र व मंत्र रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातूनच अनेक खासगी संस्था शिक्षणासाठी प्रसारक मंडळांना मिळाले. १९६० सालापर्यंत महाराष्ट्रातील साक्षरतेचे प्रमाण ३० च्या पुढे आले होते. त्यात निश्चितच रयत शिक्षण संस्थेच्या या चळवळीचा मोठा हातभार लागलेला आहे. ही बाब कर्मवीर जिवंत असतानाच दिसून आले होते. महाराष्ट्र शासनाने सन १९४७ च्या कायद्याने ग्रामीण भागातील लोकवस्ती कमी असणाऱ्या अनेक शाळा बंद करण्याचा योजना आखत शाळा बंद करण्यात आल्या. मात्र रयत शिक्षण संस्थेने ५०० लोकवस्तीच्या खेड्यात शाळा चालविल्या. हे रयत शिक्षण संस्थेचे महत्वपुर्ण आणि मोलाचे काम होते. अर्थात अशा कार्यामुळे कर्मवीर ज्या परिसरात शाळा काढत होते. त्या परिसरात साक्षरतेचे प्रमाण वाढलेले होते. शासनाने जरी खाजगी शाळांना अनुदान दिले नाही तरीही रयत शिक्षण स ंस्थेने शाळा बंद केल्याचे उदाहरणे पाहण्यास मिळत नाहीत. त्यामागे निश्चितच कर्मवीरांचे विविध पातळीवर असणारा जनसंपर्क आणि ध्येय पुर्ण करण्याची जिद्द होती. तसेच कर्मवीरांना मदत करण्यासाठी ग्रामीण भागातील अनेक लोक पुढे येत होते. ते त्यांच्या परीने मदत करत होते. कर्मवीर देखील ती मदत आनंदाने स्वीकारत होते. त्यामुळे अनुदान न मिळता देखील काही शाळा चालवता येणे शक्य झाले. हे त्या काळातील सर्वात मोठे कार्य होते.

श्रमप्रतिष्ठा हे मुल्य केंद्रस्थानी भाऊराव पाटील यांचे श्रमाबाबतचे विचार व मार्क्सवाद यामध्ये साम्य आढळते. मार्क्सच्या म्हणण्यानुसार प्रत्येक कामाला प्रतिष्ठा असण्याबरोबरच मूल्यदेखील असले पाहिजे. श्रमप्रतिष्ठेचा, सामाजिक सम ेचा, जातिभेद निर्मूलनाचा विचार जपणारे कृतीशील कार्यकर्ते निर्माण करणाऱ्या त्या शाळा आहेत. श्रमातून मूल्यनिर्मिती व त्यामधून व्यक्तीमत्त्व विकास या गोष्टी भाऊरावांच्या विचारात सहज पुढे येतात. कमवा व

शिका या माध्यमातून भाऊरावांनी तरुण वर्गामध्ये श्रमाबद्दलची प्रतिष्ठा निर्माण केली. कोणतेही काम करण्याची कधीही लाज वाटू नये. प्रत्येक कामाला प्रतिष्ठा असते व त्याचबरोबर त्यामधून मूल्य निर्मितीदेखील होत असते. हा अतिशय महत्त्वाचा संस्कार भाऊरावांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून संपूर्ण समाजाला दिला. रयत शिक्षण स ंस्थेतून श्रमाला प्रतिष्ठा देणारी एक पिढीच निर्माण झाली की ज्या पिढीचा महाराष्ट्राच्या संपूर्ण विकासामध्ये फार मोठा मोलाचा वाटा होता. शिक्षणाचा उद्देश व्यक्तीमत्त्व घडविणे हा आहे. थोड्या संस्थांत रयत शिक्षण संस्थेच्या शाळा, महाविद्यालये विशेषत: त्यांची वसतिगृहे यांचा समावेश होतो. (काटकर मा. भि., १९८२ पृ. ९४).

शेवटी सारांशरूपाने म्हणता येईल की, महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज यांच्या पुरोगामी विचारांचा प्रभाव भाऊरावांवर दिसतो. बहुजन समाजाला स्वातंत्र्य, समता, न्याय, शिक्षण या गोष्टी मिळाल्या पाहिजेत तरच त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. हा पुरोगामी विचार भाऊरावांनी स्वीकारला व तोच प्रत्यक्ष अंमलात आणला. भाऊराव पाटील यांनी कल्याणकारी धोरण स्वीकारले होते. भाऊराव पाटील शिक्षण या घटकांच्यामार्फत कल्याणकारी धोरण राबवित होते. सामाजिक घटक हा समाजाच्या व राष्ट्राच्या प्रगतीचा विकास आहे असा भाऊराव पाटील यांचा विचार होता. समाजाच्या विकासासाठी आर्थिक स्वावलंबनाची संकल्पना कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मांडली. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी धर्मपिक्षा ही त्यांच्या कार्याला जास्त महत्व दिले होते.

**संदर्भ :**

१) काटकर मा. भि., १९९७, नव्या पिढ्यांचा निर्माता : कर्मवीर भाऊराव पाटील, अमेय प्रकाशन, सातारा.
२) काटकर मा. भि., १९८२, कर्मवीर भाऊराव पाटील,, सौ. सरोजनी मा. काटकर प्रकाशन. सातारा.
३) कीर धनंजय, २००८, महात्मा ज्योतीबा फुले, पॉप्य ुलर प्रकाशन, मुंबई. (तिसरे पुनर्मुद्रण)
४) कडियाळ रा. अ., फेब्रु. १९९८, कर्मवीर भाऊराव पाटील : काल आणि कर्तृत्त्व, सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
५) कडियाळ रा. अ. (वर्ष नाही), कर्मवीर भाऊराव पाटील, द्वारा आर. के प्रकाशन. पाचगांव, ता. करवीर, जि. कोल्हापूर.
६) जाधव पंजाबराव, १९६५, कर्मवीर भाऊराव पाटील— जीवनदर्शन, श्रीनाथ प्रिंटीग प्रेस, पुणे.
७) जाधव रा. बा. (स ंपा) १९४८, कर्मवीर भाऊराव पाटील गौरव विशेषांक, ग्रामोद्वार प्रेस, सातारा.
८) जाधव प ंजाबराव रामराव, १९६७, कर्मवीर भाऊराव पाटील, श्री. दत्त मुद्रणालय, पुणे.
९) ठोके मो. नि. आणि चव्हाण, रा. ना., १९८७, कर्मवीर भाऊराव पाटील : शोध आणि बोध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.
१०) ढगे सुभाष, २००९, कर्मवीर भाऊराव पाटील : कार्य आणि विचार, विजय प्रकाशन, कोडोली, ता. पन्हाळा, कोल्हापूर.
११) पाटील अजित, २००४, माणसातील देव, मॅकमिलन, पुणे.
१२) पाटील पां. ग., १९६४, कर्मवीरोपनिषद, ग्रामीण जीवन अभ्यास संस्था, सातारा.
१३) मोरे अरविन्द प्र., १९८०, कर्मवीर भाऊराव पाटील, सरस्वती प्रकाशन कोल्हापूर.
१४) लोखंडे वसंत, १९६८, कर्मवीर भाऊराव पाटील, व्यक्तीदर्शन, मुद्रक—प्रकाशक : मोहनराव लोखंडे, उरण इस्लामपूर.
१५) Bhosale D.T, 2003, Karmveer Bhaurao Patil: Biography Karmveer Bhaurao Patil, Macmilan, New Delhi